# माझी आई माझी गुरु व शैक्षणिक दिपस्तंभ 

दक्षिणेची काशी व प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनीत झाल्याचा लौकिक मानल्या गेलेल्या नाशिक क्षेत्राच्या भूमीत माझे आजोबा वैकुंठवासी हरिभक्त परायण वेदांत भूषण वैद्यराज मणीराम शास्त्री गुळसकर संकुलात, दैव योगाने माझ्या आईचा जन्म झाला. त्यांच्या चव्हाटा येथील देवी मंदिरा शेजारी असलेल्या निवासात, आईचे बालपण गेले. त्या सर्व स्मृतीस विनम्र पणे वंदन करीत, आता शासकीय कन्या शाळेच्या शताब्दी उत्सवानिमीत्त कै. सौ. मुक्ताबाई चंद्रकांत सरोदे(गुळसकर बाई), माझ्या पूजनीय गुरुमाऊली दीपस्तंभ संबोधित करीत, माझ्या हृदयस्थ दडलेल्या आठवणी आदरणीय गुरुजन व जिवाभावाच्या जुन्या मैत्रिणींपुढे माझे हृदगत मनमोकळेपणे मांडू लागले तर मोठा ग्रंथ होईल, असे वाटू लागल्याने ठळक मुद्दे खाली संक्षेपात उद्धृत करीत या महा शतकी उत्सवात सहभाग नोंदवू इच्छिते.

माझी आई(सरोदे बाई) हिचे एसएससी पर्यंतचे शिक्षण पुष्पावती रुंगटा शाळा येथे झाले. चव्हाटा ते अशोक स्तंभ हे दीड ते दोन मैला चे अंतर आई रोज पायी ये-जा करत असे. नाशिकचे आकर्षण वाटणारी ब्रिटिशांनी उभारलेली दगडी भव्य इमारत व कुंपण युक्त बंदिस्त हायस्कूल रोजच ती पाहत असे. तेव्हा आपणाला कधीतरी या इमारतीची पायरी चढता येईल का? असा विचार तिच्या मनाला चाटून जायचा. पण त्यासाठी बी.ए. व बी.टी. या पदव्या मिळविल्या पाहिजेत हे तिला माहित होते. एसएससी उत्तीर्ण झाल्यानंतर नाशिकच्या एच.पी.टी. कॉलेज मधून बी.ए. ला प्रथम क्रमांक पटकावून, मनोवांच्छित पायरीवर आरुढ झाली .

23 फेब्रुवारी 1957 ला लग्न होऊन नाशिक मधील जुन्या तांबट गल्लीत सासरला येताच आईच्या थोर सासुबाई लिलाबाई यांनी सांगताच “तुला आता बी.टी. साठी नाशिक बाहेर पडावे लागेल पण तिथला खर्च तुला कसा देता येईल?” तेव्हा काही काळ शिक्षकी नोकरी एस. जे. हायस्कूल मध्ये तिने केली. त्यामुळे पुण्यात बी.टी. ला प्रवेश व त्यासाठी संस्कृत अध्यापनाची अर्धवेळ नोकरी अशी आईने धमक दाखवीत पात्रता पूर्ण केली. परतून येताच तात्पुरती गुजराती शाळेत नोकरी केली व संस्कृत विषयाचे अध्यापन केले. आईला गव्हर्न्मेंट गर्ल्स हायस्कूल कडून नेमणुकीचा हुकूम प्राप्त झाला. त्या ज्ञान मंदिराच्या पायरीवर आरूढ होऊन शाळेशी व तुमच्याशी मैत्री व जिव्हाळ्याचे नाते आईचे जोडले.

बऱ्याच आशा आकांक्षा मनात घोळत असताना मोठ्या उत्साहाने नोकरीत आई रुजू झाली. अतिशय विद्वान, शिस्तप्रिय व द्रष्टे पणा असलेले भारदस्त मुख्याध्यापिका राजदेरकर बाईंचे करारी व्यक्तिमत्व तिला लाभले व तिचा उत्साह दुणावला. नवनव्या कल्पना, नवे उपक्रम व त्यासाठी चौकस बुद्धीने विद्यार्थिनींची कोणत्या उपक्रमात निवड करायची व त्यांच्या आवडीनुसार संधी देऊन मार्गदर्शन

करीत शालेय संस्कृतीचा वारसा आईने जोपासला. योगायोगाने मी व मंजुषा याच शाळेच्या विद्यार्थिनी झाले म्हणजे आईच गुरु हे सारे इथंभूत कथन केल्याचा हा पूर्वार्ध !

याच शाळेत उत्तमोत्तम सेवा बजावताना आईला प्रथम पर्यवेक्षक पद तर मिळालेच पण पुढे मुख्याध्यापिका पदास पात्र ठरत राजपत्रित अधिकारी बनली. पैठणच्या शाळेचे नेतृत्व करीत भरपूर विविध उपक्रम करता आले. तेथून परत नाशिकला परतताना प्राचार्य व वसतिगृहयुक्त म्हणून लेडीज सुपरिटेंडेंट पदामुळे वर्टी कॉलनीत वसतिगृहास जोडून सरकारी निवासस्थानी कुटुंबासह राहण्याची सोय झाली. जागतिक युनो संघटनेकडून दुर्गम व मागास भागातील 10 शाळांचा व त्या खेड्यांचा सर्वांगीण विकासाच्या प्रकल्प अंतर्गत पाच वर्षे शाळांना भेटी व उद्‌बोधन कार्य प्राचार्य पदावर अखंड चालू केले. पूर्ण साक्षरता, वाचन, लेखनाद्‌वारे शैक्षणिक प्रगती केल्याचा विशेष मान आईला मिळाला.

सरोदे बाईंनी शाळा व घर या प्रत्येकाला योग्य न्याय दिला. एसएससी पेपर तपासणीचे काम तर रात्र जागून केले. डीएड कॉलेजला प्राचार्य असताना तिने मेरीट प्रमाणे सर्व कॉलेजला गुणवंत विद्यार्थी प्राप्त व्हाव्यात म्हणून आग्रह धरला. त्यामुळे गरीब घरातील विद्यार्थिनींनाही योग्य न्याय मिळवून त्या ज्ञानाच्या प्रवाहात आल्या. मैत्रिणींचा व सहकाऱ्यांचा आईला नेहमीच अभिमान वाटे. आईचे प्रेमळ, शांत, प्रसन्न, तेजस्वी, विज्ञान व अध्यात्म यांची सांगड घालणारे व्यक्तिमत्व, धीरोदात्त पद्‌धतीने संकटाशी मुकाबला करण्याची तिची पद्‌धत, प्रत्येकाबद्‌दल प्रेमभाव, अगदी सहजतेने अध्यात्मातील गर्भित अर्थ सांगण्याची तिची पद्‌धत हे सर्व आठवले की षडरिपूवर विजयश्री प्राप्त केलेली माझी आई म्हणजे खरोखरीच परमेश्वर रूप होती. तिचे अतिशय आवडते गीत ती नेहमी गुणगुणायची (कुठे शोधिशी रामेश्वर अन कुठे शोधिशी काशी, हृदयातील भगवंत राहीला हृदयातून उपाशी...). आईच्या सानिध्यात आम्ही कित्येक वर्षे राहिलो पण तेव्हा मला खरे उमगलेच नाही तिच्या प्रत्येक वाक्यातील, कृतीतील अध्यात्माची उंची मात्र आज जाणवते. शिक्षण क्षेत्रात व उत्तम मार्गदर्शक असलेले माझे वडील श्री. चंद्रकांत अर्जुनराव सरोदे यांची साथ आई व आम्हा सर्वांना क्षणोक्षणी लाभली. तसेच आईने प्रसिद्‌ध जादूगार असलेल्या माझ्या वडिलांना जादू प्रयोगांमध्ये साथ दिली. माझी मावशी सौ. कमल सुधाकर साळी हिने कठीण काळात आईला दिलेली साथ व तिचा त्याग आई व आम्हा सर्वांसाठी अतुलनीय आहे.

शिक्षण खात्यातील अलौकिक दीपस्तंभ बनून शिक्षणाच्या जहाजांना अचूक दिशा व वाटा स्वयम् प्रकाशाने दाखवीत उत्कर्षाची वाटेकरू असलेल्या माझ्या आईचा मला अभिमान तर आहेच व तिची कन्या मी आईचे अनुकरण करीत आदर्श माध्यमिक विद्यालय येथे मुख्याध्यापिका टप्प्यावर येऊन शाळेला आदर्श गुण व लौकिक संपन्नतेच्या मार्गाने वाटचाल करीत आहे, तसेच माझी बहीण मंजुषा बिटको कॉलेजला उपप्राचार्य म्हणून कार्यरत असून नॅक कमिटी सदस्य देखील आहे.

गव्हर्मेंट गर्ल्स हायस्कूलच्या शतकोत्सवात "माझी आई माझी गुरु व शैक्षणिक दिपस्तंभ" एक झलक मांडण्याची संधी दिल्याबद्‌दल संयोजकांचे कृतज्ञता पूर्वक आभार मानते. जय हिंद!

आपली विनम्र,
सौ. अंजली राजीव ठोके
(मुख्याध्यापिका, आदर्श माध्यमिक विद्यालय, नाशिक)